पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २४ जून २०२६

# 'दररोजच्या अभ्यासातूनच यशाची शिखरे गाठता येतात'

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी एका वेळी खूप अभ्यास करण्याऐवजी दररोज नियमित व नियोजनबद्ध अभ्यास केल्यास बोर्ड परीक्षेत उज्ज्वल यश मिळविता येते, असे प्रतिपादन गुणवंत विद्यार्थिनी मनुश्री शहाने केले. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजच्या कला व वाणिज्य शाखेतर्फे आयोजित गुणवंत विद्यार्थी मार्गदर्शन कार्यक्रमात ती बोलत होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विभागप्रमुख प्रा. शिल्पा भोसले होत्या. अध्यक्षीय भाषणात प्रा. भोसले यांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यासाची सवय लावण्याचे आवाहन केले. सातत्यपूर्ण ज्ञानार्जन व अभ्यासातील शिस्त यामुळे ध्येय साध्य करता येते. यश मिळविण्यासाठी संतत प्रयत्नशील राहणे व नियमित अभ्यास करणे हाच सर्वोत्तम मार्ग असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रा. यू. एच. तिजाईकर यांनी प्रास्ताविक केले. प्रा. एस. पी. वेदांते यांनी आभार मानले.